MHTH120015962013

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | १७ | १० | २०१३ |
| नोंदणी तारीख | : | १७ | १० | २०१३ |
| निकाल तारीख | : | ०७ | ०२ | २०२५ |
| कालावधी | : | ११ व. | ०३ म. | २१ दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र. १०) बेलापुर यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी श्रीमती पी. जे. शेटटी यांचे समक्ष)**

**नियमित फौजदारी खटला क्र. १३८६/२०१३** **निशाणी क्र. (६९)**

| | |
|---|---|
| | गुन्हा क्र : I ५५/२०१३<br>पोलिस स्टेशन : रबाळे एमआयडीसी |
| तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलिस स्टेशन, रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे |
| अधिवक्ता | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. आर. एस. सोनटक्के |
| आरोपी | **क्र. १ रायसाहब लालचंद यादव**<br>वय- २४ वर्षे,<br>रा. देविनाथ नगर, भोडबाईदेवी मंदिराजवळ,<br>यादवनगर, दिघा, नवी मुंबई<br>**क्र. २ मोजेस डॅनियल साळवी**<br>वय- ३४ वर्षे,<br>रा. राधा पुंडलीक अपार्टमेंट, रुम नं.१०६,<br>सुर्यनगर, विटावा, कळवा, ठाणे<br>**क्र. ३ विक्रम विनायक चव्हाण**<br>वय- २७ वर्षे,<br>रा. रुम नं.२७९५, गणेश नगर निवास,<br>जुना चिंचपाडा, ऐरोली, नवी मुंबई<br>**क्र. ४ अनंता मंगल पागी**<br>वय- २५ वर्षे,<br>रा. रुम नं.२३८२, देवीधाम नगर,<br>यादवनगर, ऐरोली, नवी मुंबई<br>**क्र. ५ ओमप्रकाश भिका कश्यप**<br>वय- ३५ वर्षे,<br>रा. रुम नं.२३८२, देवीधाम नगर,<br>यादवनगर, ऐरोली, नवी मुंबई |
| अधिवक्ता | आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.अभिनव रहाटे |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | दि.०८-०७-२०१३ रोजी १५.०० वाजेच्या सुमारास |
| प्रथम खबरी तारीख | १०-०७-२०१३ |
| आरोपपत्राची दाखल तारीख | १७-१०-२०१३ |
| आरोपपत्र निश्चित केल्याची तारीख | १७-०६-२०२३ |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | ०४.०९.२०२४ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | --- |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०७-०२-२०२५ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख जर असेल तर | निरंक |

| क्र | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | आरोपीने केलेले गुन्हे | निर्दोष किंव्हा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४२८ फौ.प्र.सं च्या उद्देशाने खटलेल्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रायसाहब लालचंद यादव | १७/०७/२०१३ | २३/०७/२०१३ | भा.द.वि. कलम ३३८ सहकलम ३४ सह भा.ह.कायदा कलम ३, २५, २७ अन्वये | निर्दोष | - | - |
| २. | मोजेस डॅनियल साळवी | १७/०७/२०१३ | २३/०७/२०१३ | भा.द.वि. कलम ३३८ सहकलम ३४ सह भा.ह.कायदा कलम ३, २५, २७ अन्वये | निर्दोष | - | - |
| ३. | विक्रम चव्हाण विनायक चव्हाण | २०/०७/२०१३ | २३/०७/२०१३ | भा.द.वि. कलम ३३८ सहकलम ३४ | निर्दोष | - | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सह भा.ह.कायदा कलम ३, २५, २७ अन्वये | | | |
| ४. | अनंता मंगल पागी | २०/०७/२० १३ | २४/०९/२०१ ३ | भा.द.वि. कलम ३३८ सहकलम ३४ सह भा.ह.कायदा कलम ३, २५, २७ अन्वये | निर्दोष | - | - |
| ५ | ओमप्रकाश भिका कश्यप | २०/०७/२० १३ | २४/०९/२०१ ३ | भा.द.वि. कलम ३३८ सहकलम ३४ सह भा.ह.कायदा कलम ३, २५, २७ अन्वये | निर्दोष | - | - |

## न्या य नि र्ण य

**( घोषणा दिनांक ०७/०२/२०२५)**

आरोपी हा भा.द.वि. कलम ३३८ सहकलम ३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५, २७ अन्वये निश्चित केलेल्या दोषारोपाच्या संपरिक्षेसाठी प्रस्तुत खटल्यात सामोरे गेला आहे.

**अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

**०२.** दि.०८/०७/२०१३ रोजी १५.०० वाजेच्या सुमारास गणेश नगर, चिंचपाडा येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी हे त्यांच्या राहते घराचे बाहेर बसलेले असताना आरोपी त्याठिकाणी आले व गैरकायदेशिर गावठी पिस्तुल विक्री करण्यासाठी आलेले असतांना मोजेस डॅनियल साळवी याचेकडुन गावठी पिस्तुल हाताळत असतांना त्यामधुन फायर होवून त्याची गोळी फिर्यादीचे पाठीमागे घुसून त्या गंभीर जखमी झाल्या म्हणुन आरोपीं विरुध्द रबाळे एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली.

**०३.** सदरच्या फिर्यादीवरुन आरोपी विरुध्द गुन्हा क्र. ५५/२०२३ भा.द.वि. कलम

३३८ सहकलम ३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५, २७ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक कैलास बर्वे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, मुददेमाल हस्तगत केला व तपासपूर्ण करुन आरोपींविरुध्द सदर न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**०४.** आरोपींविरुध्द भा.द.वि. कलम ३३८ सहकलम ३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५, २७ अन्वये दोषारोप (नि.३२) निर्धारीत केले. सदर दोषारोप आरोपींना मातृभाषेत समजावून सांगितला असता त्यांनी आरोप नाकारले व खटला चालविण्याची मागणी केली .

प्रस्तुत खटल्यामध्ये सरकारपक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्याअंती आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१) ब अन्वये निवेदन निशाणी क्र. ६३ ते ६६ अन्वये नोंदविण्यात आले. आरोपींनी केस खोटी असल्याचा बचाव केला.

**०५.** **<u>युक्तीवाद, मुददे व निष्कर्ष :-</u>** सरकारपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. आर. एस. सोनटक्के यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. आरोपीतर्फे वकील श्री. रहाटे यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणाच्या न्यायीक निकालासाठी उदभवलेले मुददे, त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने सिदध् केले काय की, दि.०८/०७/२०१३ रोजी १५.०० वाजेच्या सुमारास गणेश नगर, चिंचपाडा, नवी मुंबई येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी हे त्यांच्या घराबाहेर बसलेले असताना गैरकायदेशिर गावठी पिस्तुल विक्री करण्यासाठी आणलेले असतांना मोजेस डॅनियल साळवी याचेकडुन गावठी पिस्तुल हाताळत असतांना त्यामधुन फायर होवून त्याची गोळी फिर्यादीचे पाठीमागे घुसून त्या गंभीर जखमी झाल्या व अशाप्रकारे भा.द.वि. कलम ३३८ सहकलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला ? | ..... नकारार्थी |
| २ | अभियोग पक्षाने सिदध् केले काय की, वरिल दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन अवैद्यरित्या, विना परवाना गावठी पिस्तुला सारखे घातक शस्त्र स्वत:च्या ताबे कब्जात बाळगले व विक्री करणेच्या उददेशाने बाळगले व अशाप्रकारे भारतीय | ..... नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | हत्यार कायदा कलम ३, २५ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला ? | |
| ३ | अभियोग पक्षाने सिदध् केले काय की, वरिल दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन अवैद्यरित्या, विना परवाना गावठी पिस्तुला सारखे घातक शस्त्र स्वत:च्या ताबे कब्जात असून विक्री करणेच्या उददेशाने बाळगले व अशाप्रकारे भारतीय हत्यार कायदा कलम २७ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | ..... नकारार्थी |
| ४ | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**-: कारणमिमांसा :-**

## अ. अभियोग पक्ष :-

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| ०१ | मोनु श्रीकांत गुप्ता | ४७ | साक्षीदार |
| ०२ | मंजर सुरेंद्र राजभर | ४८ | साक्षीदार |
| ०३ | मोहन गुंडाजी सोनवणे | ४९ | पंच साक्षीदार |
| ०४ | कैलास विमल वसंत बर्वे | ५९ | तपासी अधिकारी |

## ब. आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर :-

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

## क. न्यायालया कडून साक्षीदार, जर असेल तर :-

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**फिर्यादीपक्ष/आरोपी पक्ष/ न्यायालयातील निशाणी क्रमांकांची यादी**

**अ. फिर्यादीपक्ष :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ५० | घटनास्थळ पंचनामा |
| २ | ५१ व ५२ | जप्ती पंचनामा |
| ३ | अ ते ई | आर्टिकल |
| ४ | ६० व ६१ | मुददेमाल पावती |
| ५ | ६२ | पत्र |

**ब.बचाव पक्ष :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालय :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | |

**०६.** आरोपींविरुध्दचा भा.द.वि. कलम ३३८ सहकलम ३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ अन्वये गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाला हे सिध्द करणे गरजेचे आहे की, फिर्यादी हे त्यांच्या राहते घराचे बाहेर बसलेले असताना आरोपी त्याठिकाणी आले व अवैद्यरित्या, विनापरवाना गावठी बाळगुन ती पिस्तुल विक्री करण्यासाठी आलेले असतांना मोजेस डॅनियल साळवी याचेकडुन गावठी पिस्तुल हाताळत असतांना त्यामधुन फायर होवून त्याची गोळी फिर्यादीचे पाठीमागे घुसून त्यांना गंभीर जखमी केले.

**<u>मुददे क्र. १ ते ३ करीता :-</u>**

**०७.** अभियोग पक्षामार्फत आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्याकरिता (साक्षीदार क्र ०१) मोनु श्रीकांत गुप्ता यांना निशाणी ४७ अन्वये तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांचे साक्षीत कथन केले की, दि.१०/०७/२०१३ रोजी ते रात्रपाळी कामावर असुन सदर दिवशी फायरींग झाली असल्याची केस झाल्याचे त्यांना समजले. कुणी कुणावर गोळी झाडली याबाबत त्यांना

काही माहिती नाही.

०८. अभियोग पक्षामार्फत आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्याकरिता साक्षीदार मंजर सुरेंद्र राजभर (सा.क्र.०२) यांना निशाणी ४८ अन्वये तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांचे साक्षीत कथन केले की, ते आरोपींना ओळखत नाहीत. सदर घटनेच्या दिवशी ते मुलूंड येथे होते. सदर घटनेक एका महिलेला गोळी लागल्याचे त्यांना समजले. सदर महिला त्यांचे १० ते १२ घरे सोडुन राहण्यास होती. ज्या महिलेला गोळी लागली तिचे नाव त्यांना माहिती नाही. पोलीसांनी त्यांची घेतली होती. कोणी कोणावर गोळी झाडली हे त्यांना माहिती नाही.

०९. अभियोग पक्षामार्फत आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्याकरिता पंच मोहन गुंडाजी सोनवणे (साक्षीदार क्र ०३) यांना निशाणी ४९ अन्वये तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांचे साक्षीत कथन केले की, दि. १७/०७/२०१३ रोजी त्यांनी एपीआय गावडे यांनी रबाळे पोलीस स्टेशन येथे बोलावले होते. त्यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सप्तगीरी हॉटेल सेक्टर १ ऐरोली येथे अग्नीशस्त्र व गावठी पिस्तुलची विक्री करण्यासाठी काही इसम येणार आहेत. त्यांना सापळा रचुन ताब्यात घ्यायचे आहे. त्याप्रमाणे ते, दुसरा पंच, पोलीस स्टाफ असे सप्लगिरी हॉटेलच्या काही अंतरावर थांबले. बातमीदाराने सांगितल्याप्रमाणे एक इसम काळा हाफ टिशर्ट व हाफ पॅन्ट व दुस-या इसमाने पांढरा फुल शर्ट व हाफ पॅन्ट घातलेले रिक्षातुन उतरले व त्यांनी हॉटेलमध्ये प्रवेश केला. त्यानंतर हॉटलेमध्ये बसलेले पोलीस शिपाई टेकनार यांनी सदर इसम तेच आहेत याची खात्री झालेनंतर १० मिनीटांनी एपीआय गावडे यांना इशारा केला. त्यानंतर एपीआय गावडे व त्यानंतर त्यांनी हॉटेलमध्ये प्रवेश केला. सदरील दोन इसम हॉटेलमधील एका कोप-यामध्ये एकमेकांकडे तोंड करुन बसले होते. त्यांनतर पोलीसांनी त्यांना ताब्यात घेतले व त्यांची अंगझडती बाबत विचारणा केली असता पोलीस शिपाई गायकवाड यांनी मोझेस डॅनियल याच्या पॅन्टच्या उजव्या बाजुस गावठी रिव्हॉल्वर व डाव्या बाजुस सॅमसंग कंपनीचा मोबाईल मिळुन आला. दुसरा इसम रायसाहेब लालचंद यादव याच्या खिश्यातुन जिवंत दोन काडतुस व सॅमसंग कंपनीचा मोबाईल मिळुन आला. सदरील काडतुस प्लॉस्टीकच्या पिशवीत होते. पंच शिंदे उपस्थित होता. पोलीसांनी सदरील मुददेमाल ताब्यात घेवून आरोपींना अटक केली व त्यांच्या समक्ष पोलीसांनी सापळा व घटनास्थळ पंचनामा केला. नि.क्र. ५० वरील घटनास्थळ पंचनाम्यावर अनु.क्र.२ वर त्यांची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर

आहे. त्यानंतर दि.२०/०७/२०१३ रोजी पोलीस निरीक्षक कैलास बर्वे यांनी त्यांना निवेदन पंचनाम्याकरीता बोलविले. तेथे दुसरा पंच राजेंद्र शिंदे उपथित होता. पोलीसांनी सदरील आरोपींना रिव्हॉल्वर बददल विचारणा केली तेव्हा सदर आरोपींनी सदर रिव्हॉल्वर मधुन चुकून फायर झाली असुन सदर रिव्हॉलवर झाडाखाली लपवुन ठेवली असे सांगितले. सदर निवेदनाप्रमाणे ते त्याठिकाणी गेले असता आरोपीने झाडाखाली प्लॉस्टीकच्या पिशवमीध्ये पुरुन ठेवलेले रिव्हॉल्वर काढुन दिले. त्यानंतर पोलीसांनी त्यांच्या समक्ष जप्ती पंचनामा केला. सदरच्या नि.क्र. ५१ वरील जप्ती पंचनाम्यावर त्यांची अनु.क्र.२ वर सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर दि.२२/०७/२०१३ रोजी पोलीस निरीक्षक बर्वे यांनी त्यांनी बोलावले. तेव्हा आरोपी विक्रमसिंग चौहाण याने आरोपी मोझेस याच्याकडुन विकत घेतलेले रिव्हॉल्वर रिलायएबल टे कपंनीसमोर त्याचे रहाते घरी झाडाखाली पुरुन ठेवले असल्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे ते आरोपीच्या निवेदनाप्रमाणे त्याठिकाणी गेले असता आरोपीने पुरुन ठेवलेले रिव्हॉलवर जपत केले व त्याचा जप्ती पंचनामा केला. सदरच्या नि.क्र. ५२ वरील जप्ती पंचनाम्यावर त्यांची अनु.क्र. २ वर सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. सदर साक्षीदाराने त्याच्या समक्ष जप्त केलेला आर्टिकल अ ते ई वरील जप्ती मुददेमाल गावटी कटटा, रिव्हॉल्वर व काडतुस ओळखले. तसेच सदर साक्षीदाराने आरोपींना देखील ओळखले.

**१०.** आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात साक्षीदाराने कथन केले की, त्यांनी आजतागायत ब-याच केसेसमध्ये पंच म्हणुन काम केले आहे. साक्षीदाराने मान्य केले की, ते कोणत्या वाहनाने घटनास्थळी गेले त्या वाहनाचा नंबर ते सांगु शकत नाही. जप्ती पंचनाम्यासाठी जाण्याकरीता स्टेशनडायरीला त्यांनी सहया केल्या नाहीत तसेच आरोपींच्या सहया घेतल्या नाहीत. तसेच दि.२२/०७/२०१३ रोजी आरोपी हा पोलीसांच्या ताब्यात होता त्यावेळी जप्त पंचनाम्यासाठी जाण्याकरीता स्टेशनडायरीला त्यांनी सहया केल्या नाहीत तसेच आरोपींच्याही सहया घेतल्या नाहीत. तसेच दिनांक १७/७/२०२३ रोजी सत्तागिरी हॉटेल येथे छापा टाकला तेव्हा ते व दुसरे पंच हॉटेल बाहेर होते तसेच हॉटेल मध्ये त्यावेळी इतरही गि-हाईक असल्याचे त्यांनी मान्य केले असून सदरील हॉटेल हे दोन मजली असून आरोपी नेमके कोणत्या मजल्यावर मिळून आले या बाबतचा मजकूर पंचनाम्यात नसल्याचे मान्य केले.

**११.** अभियोग पक्षामार्फत आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्याकरिता तपासी

कैलास विमल वसंत बर्वे (साक्षीदार क्र ०४) यांना निशाणी ५९ अन्वये तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांचे साक्षीत कथन केले की, सन २०१३ मध्ये ते रबाळे एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे दुययम पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत असतांना गु.र.क्र.१५५/२०१३ हा एपीआय गावडे यांनी दाखल केला होता व त्याचा तपास वरिष्ठांच्या तोंडी आदेशान्वये त्यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता. तपासाच्या अनुषंगाने फिर्यादीचा जबाब, साक्षीदारांचे जबाब, फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळाले. आरोपींना अटक केली व आरोपींकडुन गावठी पिस्तुल जप्त केले. दोन पंचासमक्ष जप्ती पंचनामा केला. आरोपी रायसाहब लालचंद यादव याच्या ताब्यातुन गावठी पिस्तुन जप्त केले. सदरील गावठी पिस्तुल मुददेमाल कक्षात जमा केला व त्याची रितसर पावती नि.क्र. ६० केली. आरोपी विक्रल चव्हाण याने दिलेल्या नि.क्र. ५२ वरिल निवेदनाप्रमाणे निवेदन पंचनामा करुन त्याचे ताब्यातुन अजुन एक तपकीरी रंगाचे ९ एमएमचे पिस्तुल जप्त करण्यात आले. त्याची रितसर पावती नि.क्र. ६१ केली. सदरील मुददेमाल तपासणीकरीता नि.क्र. ६२ वरील पत्रासोबत पाठविण्यात आले. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपीं विरुध्द पुरावा मिळुन आल्याने दोषारोपत्र दाखल केले. सदर साक्षीदार यांनी त्यांच्या कर्तव्याप्रमाणे साक्ष दिली आहे.

**१२.** आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात साक्षीदाराने कथन केले की, फिर्यादीचे जबाबात ती मंजुदेवी गुप्ता हिच्या सोबत बोलत असतांना तिला काहितरी लागल्याचे जाणवले असे नमुद असुन त्यासदंर्भात त्यांनी मंजुदेवी गुप्ता हिचा जबाब नोंदविला नाही. तसेच फिर्यादीने डॉ.जहिर उर्फ रियाजुद्दीन पाशा यांचेकडे उपचार घेतले असुन त्यांनी तपासादरम्यान डॉ.जहिर उर्फ रियाजुददीन पाशा यांचा जबाब नोंदविलेला नाही. फिर्यादीला दि.०८/०७/२०१३ रोजी दुखापत झाली असुन फिर्याद दि.१०/०७/२०१३ रोजी दाखल केलेली आहे. साक्षीदाराने पुढे मान्य केले की, फिर्याद दाखल करण्याकरीता १२ तासापेक्षा जास्त विलंब झाला असुन त्याचे कारण फिर्यादमध्ये नमुद केलेले नाही. साक्षीदाराने पुढे मान्य केले की, सदर गुन्हयांच्या संदर्भात सप्तगिरी हॉटेल मधील मॅनेजर, कर्मचारी व इतर गि-हाईकांचा त्यांनी जबाब नोंदविलेला नाही.

**१३.** अभियोगपक्षाच्या कथनानुसार अभियोगपक्षाने आरोपीने मोजेस डॅनियल यांचेकडून गावठी स्तुिल हाळत असताना त्यामध्ये फायर होवून त्याची गोळी फिर्यादीचे पाठीमागे घुसून फिर्यादी गंभीर झाली हे शाबित करणे आवश्यक आहे. त्याकरिता अभियोगपक्षाने सर्वप्रथम

फिर्यादी ही गंभीर जखमी झाली हि बाब शाबित करणे आवश्यक आहे. परंतु एकंदरीत अभियोगपक्षामार्फत घेण्यात आलेल्या साक्षीदारांचा पुरावा पाहता असे दिसुन येते की, अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. १ व २ हे घटनेतील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन त्यांनी अभियोगपक्षास सहाय केलेले नाही. सदर साक्षीदारांनी त्यांना घटनेबददल ऐकीव माहिती असल्याचे कथन केले. याउलट फिर्यादीने दिलेल्या फिर्यादचे अवलोकन केले असता फिर्यादी हया साक्षीदार क्रं १ यांच्या सोबत केळीच्या गाडीजवळ गप्पा मारत बसलेले असताना अचानक फटाक असा आवाज आला व पाठीत एकदम काहीतरी घुसल्यासारखे वाटले. त्यामुळे त्या अचानक किंचाळल्या व साक्षीदार क्रं १ मंजुदेवी यांना त्यांचे पतीस बोलवण्यास सांगितले असे नमुद केले आहे. अभियोगपक्षामार्फत फिर्यादी हे दिलेल्या पत्यावर मिळून न आल्याने तसेच त्यांनी दिलेल्या मोबाईल नंबर संपर्क केला असता संपर्क होवू न शकल्याने फिर्यादीचा पुरावा नोंदविण्यात आलेला नाही. त्यामुळे अभियोगपक्षातर्फे फिर्याद शाबीत होवू शकली नाही. अभियोगपक्षातर्फे घटनास्थळ व जप्ती पंचनामा शाबीत करण्यात आला असला तरी घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील प्रत्यक्षदर्शी व स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत तसेच त्यांचा जबाब देखील नोंदविण्यात आलेला नाही.

**१४.** तसेच फिर्यादीस गावठी पिस्तुल मधुन फायर झालेली गोळी लागली हि बाब शाबित करण्याकरिता अभियोगपक्षामार्फत फिर्यादीचे वैदयकीय प्रमाणपत्र देखील अभिलेखासदरी दाखल करण्यात आले नाही तसेच तत्सम वैदयकीय अधिकारी यांचा पुरावा अभिलेखासदरी आलेला नाहीत. सबब फिर्यादीस पिस्तुल मधील गोळी लागली ही बाब निर्विवादपणे शाबित होत नसल्याने सदरील गोळी ही आरोपी हाताळत असलेल्या पिस्तुलमधून निघाली या अभियोगपक्षाच्या कथनाबाबत शंका निर्माण होते.

**१५.** अभियोगपक्षाचे कथनानुसार आरोपी यांनी आपापसात संगनमत करून अवैधरित्या, विना परवाना विक्रीकरता गावठी पिस्तुलासारखे शस्त्र स्वत:च्या ताबेकब्जात बाळगले असून त्याकरिता अभियोगपक्षाने सदरील आरोपींनी संगनमत करून गावठी कटटा, पिस्तुल, जिवंत कडतुसे विक्री करण्याकरिता बाळगले हि बाब शाबित करणे आवश्यक आहे. सदरील बाब शाबित करण्याकरिता अभियोगपक्षामार्फत केवळ निवेदनावरील पंच व तपासी अधिकारी यांना तपासण्यात आले. सबब सदर साक्षीदाराच्या जबाबाचे काळजीपूर्वक अवलोकन करणे आवश्यक आहे.

१६. अभियोगपक्षामार्फत नि. क्र. ५०, ५१, व ५२ वरील पंचनाम्याकरीता मोहन सोनावणे व राजेश शिंदे हे पंच असून अभियोगपक्षामार्फत मोहन सोनावणे यांना तपासण्यात आले. त्यांच्या साक्षीबाबतचे अवलोकन केले असता त्यांनी यापूर्वी अश्या प्रकरणामध्ये पंच म्हणून काम केले असल्याची बाब मान्य केली. तसेच सदर साक्षीदाराचे जबाबात नि. क्रं ५०, ५१ वरील पंचनाम्यामध्ये ब-याच तफावत दिसून येतात सदर साक्षीदाराने नि. क्रं ५० वरील पंचनाम्यान्वये मोजेस डॅनियल यांचेकडून रिव्हॉलवर व आरोपी रायसाहेब यांचेकडून काडतूस जप्त केले असे कथन केले असून पंचनाम्याचे अवलोकन केले असता आरोपी रायासाहेब याचेकडून रिव्हॉलवर व डॅनियल कडून दोन काडतुस जप्त करण्यात आले असल्याचे दिसून येते त्यामुळे पंच साक्षीदार यांनी दिलेला जबाब तसेच पंचनामा नि क्रं ५० यामध्ये महत्त्वपूर्ण तफावती दिसून येत आहे अभियोगपक्षाचे कथनाप्रमाणे सदरील संपूर्ण घटनाक्रम हा सप्तगिरी हॉटेलमध्ये झाला असून त्यावेळी दोन इसम अवैधरित्या अग्निशस्त्राची विक्री करण्याकरिता तेथे येणार असल्याची बातमी मिळाली व घटनास्थळावरून दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले परंतु सदर बाब शाबित करण्याकरिता अभियोगपक्षामार्फत हॉटेलमधील कर्मचारी, हॉटेल मालक, हॉटेल मधील जबाबदार व्यक्ती अथवा त्यावेळी हॉटेलमध्ये उपस्थित असलेले गि-हाईक यांपैकी कोणाचाही जबाब नोंदविण्यात आलेला दिसून येत नाही सबब अभियोगपक्षांचे कथनाप्रमाणे नेमका कोण सदर शस्त्रांची विक्री करिता आला व कोण खरेदीकरीता आला तसेच वास्तवात आरोपीकडून सदरील जप्त मुददेमाल त्या ठिकाणाहून ताब्यात घेण्यात आला किंवा कसे याबाबत शंका निर्माण होते.

१७. अभियोगपक्षामार्फत नि क्रं ५१ वरील पंचनाम्यामध्ये आरोपी डॅनियल साळवी याने निवेदन दिले असून त्याचे निवेदनान्वये रिव्हॉलवर जप्त करण्यात आले परंतु अभियोगपक्षामार्फत तपासण्यात आलेले स्वतंत्र साक्षीदार पंच यांनी नेमके कोणात्या आरोपीने निवेदन दिले याबाबत स्पष्टीकरण दिले नसल्याने नेमके कोणत्या आरोपीने निवेदन दिले व त्याप्रमाणे गुन्हयातील जप्त रिव्हॉलवर जप्त करण्यात आली हे शाबित होत नाही तसेच तपासी अधिकारी यांचे जबाबाचे अवलोकन केले असता सदर आरोपीने दिलेल्या निवेदनाबाबत त्याचे जबाबात उल्लेख दिसून येत नाही. सबब निवेदन पंचनामे जप्ती पंचनामे यामध्ये महत्तवपूर्ण तफावती दिसून येतात. अभियोगपक्षामार्फत आरापीच्या ताब्यातुन जप्त मुददेमाल करण्यात आला किंवा कसे याबाबत शंका निर्माण होते. तसेच अभियोगपक्षामार्फत घटनास्थळावरील

स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आले नसल्याने अभियोगपक्षामार्फत तपासण्यात आलेले पंच साक्षीदार व तपासी अधीकारी यांचे जबाबावरून आरोपी हे विनापवाना, अवैध्यरित्या गावठी पिस्तुलसारखे शस्त्र विक्रीकरीता बाळगून होते तसेच सदरील हत्यार हाताळत असताना फायर झाले व त्यातील गोळी फिर्यादीस लागली हि बाब निर्विवादपणे शाबित होत नाही. अभियोगपक्ष हा सदर गुन्हयाची श्रृंखला शाबित करण्यास अपयशी ठरला आहे असे स्पष्ट होते.

**१८.** यावरुन सदर घटनेशी आरोपीचा संबंध प्रस्थापित करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे, असे स्पष्ट होते. प्रस्तुत खटल्याबाबत पोषक असा पुरावा अभियोगपक्षाने न दिल्याने प्रस्तुत प्रकरणातून आरोपींना निर्दोष मुक्त करणे न्यायोचित ठरते. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे नि ष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत :-</u>**

**१९.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदार यांच्याकडुन गुन्हा सिध्द करणारा कुठलाही सबळ पुरावा न्यायपटलावर आलेला नाही. सबब आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, वर नमुद चर्चेअंती मुददा क्र.४ च्या अनुषंगाने मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

**—: आ दे श :—**

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ रायसाहब लालचंद यादव, आरोपी क्र.२ मोजेस डॅनियल साळवी, आरोपी क्र.३ विक्रम विनायक चव्हाण व आरोपी क्र.४ अनंता मंगल पागी, आरोपी क्र.५ ओमप्रकाश भिका कश्यप यांची भा.द.वि. कलम ३३८ सहकलम ३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५, २७ या दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २४८ (१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींचा जातमुचलका व जामीन कदबा रदद करण्यात येत आहे. |
| ३. | गुन्हयातील जप्त मुददेमाल १. एक तांब्याच्या धातुचा ३.३ से.मी. लांबीचा फायर झालेला राउंड, २. एक लोखंडी बनावटीचे पिस्तुल, ३. पॉईट ९ एमएम चे दोन जिवंत राऊंड, ५. एक गावठी पिस्तुल, ७ एक तपकीरी रंगाचे ९एमएम चे पिस्टल हे अपिल |

| | |
|---|---|
| | कालावधीनंतर नियमानुसार मा.जिल्हाधिकारी सो, ठाणे यांच्याकडे पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यात यावेत. |
| ४. | गुन्हयातील जप्त मुददेमाल अनु.क्र. ४ व ६ हे मुल्यहीन असल्याने ते अपिल कालावधीनंतर नियमानुसार नाश करण्यात यावेत. |
| ५. | आरोपींना असा निर्देश करण्यात येते की, त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७ (अ) प्रमाणे अपील कोर्टात हजर राहण्याविषयीचे बंधपत्र दयावे. |

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित**

**स्वाक्षारित/-**
**(श्रीमती. पी. जे. शेट्टी)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(१० वे कोर्ट), बेलापूर, नवी मुंबई.**

**ठिकाण : सी.बी.डी. बेलापूर**
**दि. :०७/०२/२०२५**